# मुंबई - गोवा महामार्गाच्या रखडलेल्या कामासंदर्भात कोकणवासिय एकवटले


दैनिक जनसामान्यांचा आवाज RNI No. MAHMAR/2017/49039

# गुहागर सत्ता

गुहागर, चिपळूण, मुंबई येथे उपलब्ध संपादक : राजेंद्र मांडवकर

◆ वर्ष ७ ◆ अंक १३४० ◆ गुरुवार दि. १० नोव्हेंबर २०२२ ◆ पृष्ठे ४ ◆

मुल्य रु. ३/-


## मुंबई-गोवा महामार्गासाठी मानवी साखळी आंदोलन



**रोहा (बातमीदार) :** चौपदरीकरणाचे काम रखडलेले आणि दुरवस्था झालेल्या मुंबई- गोवा महामार्गाचे काम त्वरित सुरू करण्याच्या मागणीसाठी रायगड जिल्ह्यातील पत्रकारांनी मुंबई-गोवा महामार्गावर कोलाड नाका येथे मानवी साखळी आंदोलन करीत सरकारचे लक्ष वेधून घेतले. मराठी पत्रकार परिषदचे मुख्य विश्वस्त, ज्येष्ठ पत्रकार एस. एम. देशमुख यांच्या नेतृत्वाखालील हे आंदोलन करण्यात आले. मंजुरीनंतर ११ वर्षे रखडलेल्या या महामार्गाच्या चौपदरीकरणाच्या कामाची उच्चस्तरीय समिती गठित करून चौकशी व्हावी आणि दोषी ठेकेदार, अधिकारी व संबंधितांवर कडक कारवाई करण्यात यावी, अशी मागणीही या वेळी करण्यात आली. पत्रकार आणि नागरिकांनी मोठ्या संख्येने या आंदोलनात सहभाग घेतला.

मुंबई- गोवा महामार्गावरील वाढते अपघात रोखण्यासाठी या मार्गाचे चौपदरीकरण करण्यात यावे, या मागणीसाठी रायगड जिल्ह्यातील पत्रकारांनी मुंबई- गोवा महामार्गावर मानवी साखळी आंदोलन केले. रायगडमधील पत्रकारांसह समाजसेवी संस्था आणि नागरिकांनी या वेळी मोठ्या संख्येने या आंदोलनात सहभाग घेतला. याप्रसंगी ज्येष्ठ पत्रकार एस. एम. देशमुख यांच्यासह मराठी पत्रकार परिषदेचे विश्वस्त किरण नाईक, गजानन नाईक, मिलिंद अष्टीवकर, रायगड प्रेस क्लबचे अध्यक्ष भारत रांजणकर, जिल्हा पत्रकार संघाचे नागेश कुलकर्णी, अभय आपटे, विजय मोकल, अनिल भोळे आदी उपस्थित होते; तर आमदार अनिकेत तटकरे, शिवसेना रोहा तालुकाप्रमुख समीर शेडगे, रोहा सिटिझन फोरमचे अध्यक्ष नितीन परब, आप्पा देशमुख आदींसह विविध सामाजिक संघटनांनी या वेळी उपस्थित राहून आंदोलनात आपला पाठिंबा दर्शविला. यावेळी पोलिसांचा मोठा फौजफाटा तैनात करण्यात आला होता. साडेअकरा वाजता महामार्गावर मानवी साखळी करण्यात आली. अर्ध्या तासाने महामार्गाचे प्रकल्प संचालक यशवंत व्होटकर हे रोहा तहसीलदार कविता जाधव यांच्यासमवेत आंदोलनस्थळी आले. येत्या एक महिन्यात रस्ता सुस्थितीत करण्याचे आश्वासन अधिकाऱ्यांनी दिले. मात्र त्यांच्याकडून समाधानकारक उत्तरे न मिळाल्याने या विषयावर बैठक घेण्याचे ठरले. तसेच पुढील एक महिन्यात महामार्ग दुरुस्त करण्याचे अल्टिमेटम या वेळी अधिकाऱ्यांना देण्यात आले.

आम्ही सनदशीर मार्गाने या रस्त्यासाठी आंदोलन केलेले आहे. पुढील एक महिन्यात मुंबई-गोवा महामार्ग सुस्थितीत न केल्यास तीव्र आंदोलन करण्यात येईल. कोकणातील पत्रकार पुन्हा रस्त्यावर उतरून शासनाला जाब विचारतील.

**- एस. एम. देशमुख, मुख्य विश्वस्त, मराठी पत्रकार परिषद**

शिंदे-फडणवीस सरकारकडून जाणूनबुजून दुर्लक्ष केले जात आहे. या नादुरुस्त महामार्गामुळे शेकडो प्रवाशांना आपले प्राण गमवावे लागले. विद्यमान सरकारने याकामी जातीने लक्ष न दिल्यास भविष्यात ज्येष्ठ पत्रकार एस. एम. देशमुख यांच्या नेतृत्वाखाली आंदोलन पुकारण्यात येईल. **- अनिकेत तटकरे, आमदार**

## उरणवरून 25 वर्षीय खलाशी बेपत्ता
### मूळ गुहागर तालुक्यातील वेळणेश्वर येथील तरुण



**गुहागर प्रतिनिधी :** मूळचा गुहागर तालुक्यातील वेळणेश्वर येथील रहिवासी व कामानिमित्त रायगड जिल्ह्यातील उरण तालुक्यातील करंजा येथे बोटीवर खलाशी म्हणून काम करणारा २५ वर्षीय ऋतुराज काशिनाथ पावसकर हा तरुण २९ ऑक्टोबर पासून करंजा इथूनच बेपत्ता झाला आहे. याबाबतची नोंद उरण पोलीस ठाणे येथे करण्यात आले असून अद्याप मिळून आलेला नाही.

ऋतुराज पावस्कर हा मूकबधिर असून तो करंजा येथील विलास कोळी यांच्या बोटीवर खलाशी म्हणून काम करत होता. २९ ऑक्टोबर रोजी पहाटे ५.०० वाजता तो करंजा गावातूनच निघून गेला असून बेपत्ता असल्याची फिर्याद बोटीवरील तांडेल तुषार पालशेतकर यांनी उरण पोलीस ठाण्यामध्ये दिली आहे. सदर तरुण कोठे मिळून आल्यास 9326705960, 8879296030, 7350686951 या मोबाईल नंबरवर संपर्क साधावा, असे आवाहन वेळणेश्वर ग्रामपंचायतीचे सरपंच चैतन्य धोपावकर यांनी केले आहे.

## तुरुंगाबाहेर येताच संजय राऊतांची पहिली प्रतिक्रिया, म्हणाले...
### तोच उत्साह तोच जोश, गळ्यात भगवं उपरणं घालून संजय राऊत तुरुंगाबाहेर



जामीन मंजूर झाल्यानंतर पावणे सातच्या सुमारास संजय राऊत ऑर्थर रोड तुरुंगातून बाहेर आले आहेत.

शिवसेना खासदार संजय राऊत यांना अखेर जामीन मंजूर झाला आहे. पत्राचाळ घोटाळ्याप्रकरणी संजय राऊतांना ईडी अर्थात सक्तवसुली संचालनालयाने अटक केली होती. तेव्हापासून ते सीबीआय कोठडीत होते. दरम्यानच्या काळात संजय राऊतांकडून अनेकदा जामिनासाठी अर्ज दाखल करण्यात आला होता. मात्र, प्रत्येक वेळी पीएमएलए न्यायालयाकडून राऊतांचा अर्ज फेटाळून लावला होता. अखेर आज न्यायालयाने त्यांना जामीन मंजूर केला आहे.

जामीन मंजूर झाल्यानंतर पावणे सातच्या सुमारास ते ऑर्थर रोड तुरुंगातून बाहेर आले आहेत. शिवसेनेचे शेकडो कार्यकर्त्यांनी तुरुंगांबाहेर गर्दी करून संजय राऊतांचं जंगी स्वागत केलं आहे. यावेळी कार्यकर्त्यांनी तुरुंगाबाहेर फटाके फोडले.

तुरुंगाबाहेर आल्यानंतर संजय राऊतांनी आपली पहिली प्रतिक्रिया दिली आहे. ‘टीव्ही ९ मराठी’ला प्रतिक्रिया देताना संजय राऊत म्हणाले की, “तुरुंगातून सुटल्याचा आनंद आहे. यामुळे न्यायालयावरील विश्वास वाढला. माझी प्रकृती जरा बरी नाही. मी प्रसारमाध्यमांशी यावर सविस्तर बोलणार आहे” अशी प्रतिक्रिया संजय राऊतांनी दिली आहे.

## गुहागर-विजापूर रुंदीकरणातील रखडलेल्या कामांना मुहूर्त मिळेना
### मार्गताम्हाने बाजारपेठेतील रुंदीकरणाकडे सर्वांचे लक्ष, गेला ठेकेदार कुणीकडे वाहनचालकांचा सवाल



रुंदीकरणाच्या प्रतिक्षेत असलेली मार्गताम्हाने बाजारपेठ

**गुहागर/प्रतिनिधी :** वसाळा संपूनही गुहागर- विजापूर रस्ता रुंदीकरणातील रखडलेल्या कामांना ठेकेदाराला अद्याप मुहूर्त सापडलेला नसल्याचे दिसून येत आहे. याचा त्रास प्रवासी, वाहनचालकांना होत असून त्यांनी गेला ठेकेदार कुणीकडे असा सवाल उपस्थित केला आहे. याबाबत ठेकेदार, अधिकाऱ्यांना संपर्क साधला असता त्यांचा मोबाईल कधी नॉटरिचेबल तर कधी फोन उचलत नसल्याचे अनुभवायला मिळाले. दरम्यान, वादात असणाऱ्या मार्गताम्हाने बाजारपेठेतील रस्ता रुंदीकरणाकडे आता सर्वांचे लक्ष लागून आहे.

गुहागर-विजापूर रस्ता रुंदीकरणातील रामपूर ते शृंगारतळी दरम्यान, झालेल्या कामाचे अजब नमुने प्रवाशी, वाहनचालकांना अनुभवायला मिळालेले आहेत. कित्येक ठिकाणी नव्याने बांधलेल्या मोऱ्या खचणे, गटारांची बांधकामे कोसळणे, सीमेंट कॉंक्रीटकरण रस्त्याला तडे जाणे असे प्रकार सुरुच आहेत. या रस्त्याच्या निकृष्ट कामामुळे पूर्वीचा डांबरीकरणाचा रस्ता बरा होता, अशी म्हणण्याची वेळ सर्वांवरच आलेली आहे. मार्गताम्हाने पद्मावती नदी पुलाचे काम झाले मात्र, पुलावर कॉंक्रीटच नसल्याने रस्ता खडबडीत झाला आहे. प्रत्येकवेळी पुलाच्या दोनही बाजूने खडी आणून टाकली जाते मात्र, कायमस्वरुपी उपाययोजना झालेल्याच नाहीत. नदीच्या दोनही बाजूने संरक्षक भिंती बांधलेल्याच नाहीत. मार्गताम्हाने बाजारपेठेतील रस्त्याचे रुंदीकरण होईल का याबाबतही अनेकांनी शंका उपस्थित केल्या आहेत. बाजारपेठेत रुंदीकरणाला अडसर येऊन वाद होऊ नयेत म्हणून यापूर्वी ठेकेदाराने येथील ग्रामस्थांना मोबदल्यासह इतर भरमसाठ आश्वासनेही दिलेली आहेत, मात्र याबाबत अद्याप कोणतीच कार्यवाही झालेली नसल्याने येथील रुंदीकरण वादात सापडण्याची शक्यता आहे.

काळसूर कौंढर दरम्यानचे रस्त्याचे रुंदीकरण रखडलेले आहे. तसेच शृंगारतळी पालपेणेफाटा जवळील पुलावरील रुंदीकरणही रखडले आहे. हा पूल तोडल्यावर पर्यायी वाहतुकीची व्यवस्था, तेथील टपऱ्या या सर्व गोष्टी अधांतरीतच राहिलेल्या आहेत. शृंगारतळी बाजारपेठेतील एका बाजूच्या गटारांचे कामही अद्याप झालेले नाही. तसेच बसथांबाही उभारलेला नाही. त्यामुळे ही सर्वच रुंदीकरणातील रखडलेल्या कामांना पावसाळा संपूनही मुहूर्त मिळालेला नाही. यावर वाहनचालक,प्रवाशांमधून संताप व्यक्त होत आहे.

## संगणक परिचालकांच्या प्रश्नांबाबत ग्रामविकासमंत्र्यांशी चर्चा करणार-उद्योगमंत्री उदय सामंत



**गुहागर प्रतिनिधी :** राज्याचे उद्योगमंत्री उदय सामंत यांच्या समवेत झालेल्या रत्नागिरी तालुका संगणक परिचालकांच्या बैठकीत संगणक परिचालकांच्या मानधन वाढीबाबत सकारात्मक चर्चा झाली. येत्या आठ दिवसात राज्याचे ग्रामविकासमंत्री गिरीष महाजन यांचे समवेत सभा घेऊन आपल्या मानधन वाढीबाबत व अन्य समस्यांबाबत चर्चा करण्याचे आश्वासन राज्याचे उद्योगमंत्री उदय सामंत यांनी दिले.

रत्नागिरी तालुका संगणक परिचालक संघटनेतर्फे राज्याचे उद्योगमंत्री उदय सामंत यांची भेट घेत संगणक परिचालकांच्या समस्यांबाबत निवेदन देण्यात आले. ग्रामपंचायतीकडून निधी वर्ग होऊन सुध्दा मानधन अनियमित असल्याबाबत लक्ष वेधण्यात आले. महागाईने कळस गाठला असतानाही, संगणक परिचालकांना तुटपूंज्या मानधनातच गुजराण करावी लागत आहे. याशिवाय अन्य विविध समस्याबाबत चर्चा करण्यात आली.

यावेळी उद्योगमंत्री सामंत यांनी मानधन वाढीबाबत ग्रामविकास मंत्री गिरीष महाजन यांच्याशी चर्चा करण्याचे आश्वासन दिले. चर्चेवेळी संघटना प्रतिनिधींनाही मंत्रालयात बोलावणार असल्याचे सांगितले.यावेळी रत्नागिरी तालुका संगणक परिचालक संघटनेचे अध्यक्ष समीर गोताड, आसिफ नाकाडे, वैभव गुरव, निलेश शिंदे, ईशिता सावंत, संजना शेवडे, निशिगंधा घाटविलकर, सुचिता कांबळे, अमित रेवाळे, दिपक कांबळे, नितीन सागवेकर, शिवराज भोवड, भूषण सुर्वे, चंद्रकांत लिंगायत आदि संगणक परिचालक उपस्थित होते.

# संपादकीय...

## आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांचे आरक्षण योग्यच परंतु...

*आर्थिकदृष्ट्या दुर्बल वर्गाला शैक्षणिक प्रवेशात तसेच सरकारी नोकऱ्यांमध्ये 10 टक्के आरक्षण देण्याच्या केंद्र सरकारच्या निर्णयावर दिनांक 7 नोव्हेंबर 2022 रोज सोमवारला सर्वोच्च न्यायालयाच्या घटनापीठाने 3-2 अशा बहुमताने निकालाचे शिक्कामोर्तब केले. मात्र या आरक्षणातून अनुचित जाती-जमाती आणि ओबीसींना वगळण्याचा निर्णय घेतला ही अत्यंत दुर्दैवाबाब आहे.कारण कारण आजही देशातील 70 टक्के जनता आर्थिकदृष्ट्या मागासलेला आहे यात सर्वच प्रवर्गातील लोक येतात.याचाही विचार व्हायला हवा होता.फक्त खुल्या वर्गातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांनाच यांचा फायदा होणार म्हणजेच इतर आर्थिकदृष्ट्या मागासलेल लोक श्रीमंत आहेत का? असा प्रश्न निर्माण होतो.यामुळे आर्थिकदृष्ट्या आरक्षणामध्ये भेदभाव असल्याचे दिसून येते.तसे पहाले आर्थिकदृष्ट्या आरक्षणामध्ये सर्वच प्रवर्गातील लोकांना सहभागी करून घेण्याच्या दृष्टीने प्रयत्न व्हायला हवे होते.त्यामुळेच न्यायमूर्तींच्या घटनापीठाने ३-२ अशा मतांनी निकाल लागला.याला बहुमत म्हणता येणार नाही.आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांनाच्या आरक्षणाचा निकाल सर्वानुमते व्हायला हवा होता. कारण हा सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय होता. परंतु तसे झाले नाही.न्या.रवींद्र भट यांनी आर्थिकदृष्ट्या दुर्बल वर्गाला आरक्षण लागू करतांना त्यातून अनूचित जाती-जमाती आणि ओबीसींना बाहेर ठेवण्याचा निर्णय घटनाबाह्य असल्याची टीका करीत या आरक्षणाचा विरोध केला व हे आरक्षण भेदभाव करणारे आणि समानतेच्या भावनेला संपविणारे असल्याचे सांगून ते चुकीचे असल्याचे मत न्या. भट यांनी आपल्या निकालात व्यक्त केले.त्याचप्रमाणे सरन्यायाधीश उदय लळित यांनी आपण न्या.भट यांच्या विचारांशी पूर्णपणे सहमत असल्याचे निकालपत्रात म्हटले आहे.*

*म्हणजेच आर्थिकदृष्ट्या आरक्षणाचा निकाल सर्वानुमते पारीत झाला असे म्हणताच येणार नाही. आज देशाती 70 टक्के लोक महागाई, बेरोजगारी, महागडे शिक्षण, शेतकऱ्यांना निसर्गाचा तडाखा यापासून त्रस्त असल्याने आर्थिक बाजू अत्यंत दयनीय व कमकुवत आहे. ऑनलाईन प्रणालीमुळे छोटे-मोठे उद्योजक याची आर्थिकबाजु कमकुवत होत आहे.त्यामुळे ओबीसी प्रवर्गातील आहे म्हणून तो श्रीमंत आहे असे म्हणता येणार नाही.त्यामुळे संपूर्ण आरक्षण हे आर्थिकदृष्ट्या मागासवर्गीयांना दिले असते तर योग्य झाले असते. परंतु हे आरक्षण सर्वानुमते नसल्याचे 3 विरूद्ध 2 अशा घटनापीठाच्या निवाड्यावरून स्पष्ट होते.कारण घटनादुरूस्ती वैद्य ठरविण्यासाठी सरन्यायाधीश उदय लळित व न्या. एस. रवींद्र भट यांनी विरोध केला, तर न्या.दिनेश माहेश्वरी, न्या. बेला त्रिवेदी व न्या.जे.बी.पारडीवाला यांनी या घटनादुरूस्तीचे समर्थन करताना 103 व्या घटनादुरूस्तीमुळे राज्यघटनेच्या मूलभूत संरचनेचा धक्का पोहोचलेला नसल्याचे स्पष्ट केले.म्हणजेच आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी तयार केलेले आरक्षण घटनापीठाला एकमताने मंजूर नसल्याचे स्पष्ट दिसुन आले.गेल्या सात दशकांत सर्वोच्च न्यायालयात पहिल्यांदा एखाद्या घटकाला वगळण्याच्या व भेदभावाच्या संकल्पनेला मान्यता मिळाली.राज्यघटना ही एखाद्या वर्गाला वगळण्याची भाषा करीत नाही.एखाद्या घटकाला वगळण्याची केलेली भाषा न्यायाचे तत्त्व व राज्यघटनेच्या मूलभूत संरचनेचा भंग आहे असे स्पष्ट मत न्या.एस.रवींद्र भट्ट यांनी व्यक्त केले.त्यामुळे माझ्या माहितीनुसार आर्थिकदृष्ट्या आरक्षण हे भेदभावपुर्ण असल्याचे दिसून येते.सर्वोच्च न्यायालयाला मी विनंती करतो की देशातील मुठभर आजी-माजी राजकीय पुढाऱ्यांना मिळणाऱ्या सवलतींवर व त्यांच्याजवळ असलेल्या संपत्तीवर लगाम असायला हवी.याकरीता केंद्र सरकारने सुध्दा प्रयत्न करायला हवेत.कारण आजी-माजी राजकीय पुढाऱ्यांना मिळणाऱ्या सवलतींमुळेच देशाची आर्थिक बाजू कमकुवत होत आहे व याचे प्रयचित्य देशाच्या 130 कोटी जनतेला भोगावे लागत आहे.यामुळे आर्थिकदृष्ट्या आरक्षणाचा प्रश्न निर्माण झाला आहे.त्यामुळे आजी-माजी राजकीय पुढाऱ्यांच्या संपूर्ण सवलतींवर अंकुश लावायला हवा तेव्हाच देशाची व देशवासीयांची आर्थिक बाजू सुदृढ होण्यास मदत होईल.*

*लेखक*
*रमेश कृष्णराव लांजेवार*
*(माजी विद्यापीठ प्रतिनिधी नागपूर)*
*मो.नं.9921690779, नागपूर*

हे दैनिक संस्थापक, संपादक, मालक, मुद्रक, प्रकाशक श्री. राजेंद्र मांडवकर यांनी लक्ष्मी प्रिंटींग प्रेस, बाजारपेठ, शृंगारतळी, ता. गुहागर, जि. रत्नागिरी. येथे प्रकाशित केले. उपसंपादक : दिनेश चव्हाण (पीआरबी कायद्यानुसार प्रसिध्द होणाऱ्या बातम्या व संपादकीय याची पूर्ण जबाबदारी संपादक यांची राहील. तसेच अंकात प्रसिध्द झालेल्या लेखांमधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत, असतीलच असे नाही. (न्यायालयीन वाद गुहागर कक्षेत ) कार्यालयीन पत्ता : लक्ष्मी प्रिंटींग प्रेस, बाजारपेठ, शृंगारतळी, ता. गुहागर, जि. रत्नागिरी. पिन-४१५७२४कार्यालयीन संपर्क : हॉटस्‌ॲप: ७८८७९५२२०३, **Email:** dailyguhagarsatta

# गाथा कुणबी ज्ञातिगृहाची आणि दानशूर नेते कै. श्री पांडुरंगशेठ वाघे यांचे योगदान

### लेखांक दुसरा

दुसरे महायुध्दचे दुष्परिणाम आणि अपुरा निधी यामुळे सहा वर्षानंतर माहे एप्रिल १९४८ मध्ये गुढी पाडव्याच्या मुहूर्तावर इमारतीचा पायाभरणी सोहळा पार पडला. परंतु बांधकामाची जबाबदारी कोणीच घेत नव्हते. अशा परिस्थितीत समाज संघटनेच्या कार्यकारी मंडळ सभेत श्री म. रा. पवार यांनी ठराव मांडून याकामी वाघेशेठ यांनीच पुढाकार घ्यावा अशी विनंती केली. वाघेशेठ यांच्या वाढत्या वयात ही दगदग, जबाबदारी झेपणार नव्हती. तरीही त्यांनी स्वीकारली आणि पाच सदस्यांची बिल्डिंग कमिटी नेमण्याचे सुचविले. ती सर्वानुमते मंजूर करण्यात आली.

इमारतीचे बांधकाम सुरू असतानाच तळ मजल्याची उंची आणखी सहा फूट वाढवावी व आतल्या बाजूला गॅलरी काढल्यास स्त्रियांना बसण्याची सोय होईल अशी सूचना वाघेशेठ यांनी केली. यासाठी होणारा रू. १०,०००/- खर्च मुंबईत विभागवार कार्यरत असलेल्या समाज शाखानी करावा असे सुचविले. त्यास सर्व शाखानी मान्यता दिली. आतील बाजूस गॅलरी असावी असा नवीन प्लॅन मुनिसिपाल्टीकडे पाठविल्यावर लग्न कार्यास हॉल बांधल्यास परवानगी नाकारण्यात आली. कारण आसपासचा भाग राहण्यासाठी घरे बांधण्यासाठी राखून ठेवण्यात आला होता. लग्न कार्यात वाद्ये वाजविल्यास आसपासच्या रहिवाशांकडून तक्रारी येण्याचे कारण मुनिसिपालटिने सूचित केले. याकामी अधिकाऱ्यांच्या गाठीभेटी घेऊन त्यांची समजूत घालीपर्यंत ७-८ महिने काम स्थगित करण्यात आले. अखेरीस यश येऊन कामास सुरवात झाली. पण वेळोवेळी लोखंड व सिमेंट परमिट मिळण्यास अडचणी येत राहिल्या. काही काळ काम थांबवावे लागले. त्याकाळी सिमेंट ऑफिस बाहेर रात्रीच्या वेळी जाऊन रांगा लावाव्या लागत. याकामी श्री म. रा. पवार यांनी फार त्रास सहन केला. अखेर ऑगस्ट १९४९ मध्ये सिमेंटचा दोन मजल्याचा कोटा ८० टन (१६०० गोणी) घेण्याचे परमिट मिळाले. भर पावसात एक झोपडी बांधून ठेवावे लागले. त्यासाठी इमारत फंडाचे रू. ४९,०००/- खर्च झाले. मुंबईतील शांखांकडून थोडीफार आर्थिक मदत मिळत होती. परंतु त्यामधून तळमजल्याचे कामही पूर्ण होत नव्हते.



कै. पांडुरंगशेठ गोविंद वाघे
जन्म दि. १०-०७-१८८८ मृत्यु दि. १०-११-१९८०

**संकलक,**
**पी. डी. ठोंबरे**
**संचालक,**
**कुणबी सहकारी बँक ली. मुंबई.**

अशा परिस्थितीत वाघेशेठ यांनी बिल्डिंग कमिटीला सूचना केली की, कर्ज काढून काम पूर्ण करावे. परंतु एकाच इसमाकडून कर्ज घेऊ नये. कारण ठराविक मुदतीत कर्जाची परतफेड न केल्यास तो बिल्डिंग ताब्यात घेईल. शेवटीं समाजातील काही व्यक्तींकडून कर्ज घ्यावे असे विचाराअंती ठरले. त्यानंतर श्री शंकरराव महादेव बाईत, श्री नारायण बाबाजी खांबे, श्री जगन्नाथ गणपत गोताड, श्री विठ्ठल कृष्णाजी निवेंडकर आणि श्री एस. व्ही. बंडबे या पाच जणांनी रू २७,०००/- दिले. वाघेशेठ यांचे मित्र श्री गणपतरव भाऊराव पडवळ यांनी रू. ५,०००/- बिनव्याजी दिले. अशा प्रकारे संस्थेपुढे असलेली समस्या दूर झाली. दरम्यान बाजारातील सामानाच्या किमती वाढल्याने कंत्राटदारांनी काम करण्यास नकार दिला.

इमारतीच्या बांधकामात अडथळा आला असता वाघेशेठ यांनी समाजातील बिल्डिंग सुपर्वाइझर काम करत असलेले श्री नारायणराव धावडे यांना हे काम पुरे करण्याची विनंती केली. (यांचे चिरंजीव डॉ. मोहन धावडे BAMS हे दादर पूर्व, मुनिसिपल लेबर कँप येथे गेली ३० वर्षे खाजगी वैद्यकीय व्यवसाय करीत होते. माझा मनोगत काव्य संग्रह १९९० साली त्यांनी स्वतःचे लिपी प्रिंटरमध्ये अल्प किमतीत छापून दिला. नुकतेच त्यांचे दोन महिन्यांपूर्वी निधन झाले. गेली तीस वर्षे ते आमचे फॅमिली डॉक्टर होते. सन १९९५ साली कुणबी समाजोन्नती संघास ७५ वर्षे झाली तेंव्हा अमृत महोत्सव समारंभास स्वछेने देणगी दिली होती).

श्री नारायणराव धावडे यांनी जोखमीचे काम सामाजिक बांधिलकी म्हणून स्वीकारले. सर्व कामाची पाहणी करून फेब्रुवारी १९५० मध्ये कामास सुरुवात केली आणि मे अखेरपर्यंत तळमजल्या चे काम पूर्ण करून पहिल्या मजल्याचे कामास सुरुवात केली. त्यामुळे २९ मे १९५० रोजी हल हॉलचे उद्घाटन करणे शक्य झाले. याच दरम्यान कर्जाऊ घेतलेले पैसे संपल्याने गंभीर समस्या उभी राहिली. पहिल्या मजल्यासाठी आवश्यक असलेले सिमेंट आणि लोखंड पूर्वीच मिळाले होते. श्रीमती द्रौपतीबई दहिबेकर यांनी मृत्यूपत्रांवये दिलेले असल्याने या मजल्याचे काम होणे गरजेचे होते. पण त्यासाठी रू.२५,०००/- आवश्यकता भासत होती. काम पूर्ण झाल्यानंतर भाड्यातून कर्ज फेडता येईल अशी सूचना वाघेशेठ यांनी बिल्डिंग कमितीपुढे मांडली. त्यानंतर साधक बाधक चर्चा करण्यात आली व पहिला मजला भाड्याने दिल्याशिवाय पर्याय नाही असे विचार पुढे आले. परजातीतील लोकांकडून देणगी रूपाने ठळक रकमा स्वीकारण्याचा निर्णय घेण्यात आला. त्याप्रमाणे श्री काशिपती, श्री बडाल, श्री ठोंबरे, श्री हिरालाल शहा, शिवराम भगत कंपनी यांचेकडून एकूण रु. १३,५००/- देणगी स्वीकारण्यात आली. स्वतः श्री वाघेशेठ व श्री म. रा. पवार यांनी रू. १०,०००/- उसनवार दिले. काही व्यापाऱ्यांची बिले मागे ठेऊन पहिल्या मजल्याचे काम पूर्ण करण्यात आले. त्यानंतर पहिला मजला दरमहा रू.४५०/- प्रमाणे भाड्याने देण्यात आला.

अशा प्रकारे सन १९४० च्या दसरा मुहूर्तावर इमारत फंडाची स्थापना झाली. एप्रिल १९४८ गुढी पाडव्याच्या मुहूर्तावर इमारतीचा पाया घातला गेला ती इमारत अनेक आर्थिक अडचणीना सामोरे जात उभी राहिली. श्री नारायणराव धावडे यांनी अवघ्या तीन महिन्यात पहिला मजला बांधकाम पूर्ण केले. दिनांक १ सप्टेंबर१९५० पासून पहिला मजला भाड्याने देण्यात आला. मुंबईमध्ये इतक्या कमी अवधीत कोणत्याही समाजाचे किंवा संस्थेचे काम पूर्ण झालेले नाही. कुणबी ज्ञातिगृह उभारणीत श्री पांडुरंगशेठ वाघे यांचे मोलाचे योगदान आणि मार्गदर्शन लाभल्याने ते शक्य झाले.

क्रमशः.

# आंबेडकरी चळवळीतील जेष्ठ कार्यकर्ते अरविंद पवार कालवश

**दै. गुहागर सत्ता, मुंबई (प्रवीण रा. रसाळ) :** आंबेडकरी चळवळीतील जेष्ठ कार्यकर्ते तसेच भारिप बहुजन महासंघाचे वडाळा विधानसभा क्षेत्राचे माजी तालुकाध्यक्ष, वंचित बहुजन आघाडीचे संघटक, तसेच बौद्धजन सहकारी संघ शाखा क्र. ८ गाव अजगोली या शाखेचे मुंबई माजी अध्यक्ष, प्रकाश तथा बाळासाहेब आंबेडकरांचे खंदे समर्थक, राजगृह व बाबासाहेब आंबेडकर व आंबेडकर कुटुंबावर नितांत प्रेम असणारे निष्ठावंत शिलेदार, क्रीडाक्षेत्रात क्रिकेटपटू व फुटबॉलपटू म्हणून नावलौकिक मिळविलेले मौजे गाव अजगोली, ता. गुहागर, जिल्हा रत्नागिरी या गावचे सुपुत्र अरविंद गणपत पवार यांचे हृदयविकाराच्या झटक्याने वयाच्या ५७व्या वर्षी दुःखद निधन झाले.

दिवंगत अरविंद पवार हे धडाकेबाज व धडाडीचे कार्यकर्ता म्हणून सर्वज्ञात होते,



चळवळीची धगधगती आग म्हणून त्यांची ओळख होती, आपल्या व्यक्तिमत्व व कार्याच्या जोरावर त्यांनी नायगाव विधानसभा क्षेत्रात ठसा उमटला होता, ते मनमिळाऊ, सर्वसमावेशक स्वभावाचे होते, समाजातील सर्वच स्तरातील लोकांशी त्यांचे घनिष्ठ संबंध असल्याने त्यांच्या अचानक जाण्याने समाजात हळहळ व्यक्त केली जात आहे. दिवंगत अरविंद पवार यांच्या अंत्ययात्रेला बाबासाहेब आंबेडकरांचे नातू, बौद्धजन पंचायत समितीचे सभापती सरसेनानी आनंदराज आंबेडकर जातीने हजर होते, त्याचबरोबर वंचित बहुजन आघाडी, भारिप, भारतीय बौद्ध महासभा, बौद्धजन पंचायत समिती व समाजातील विविध स्तरातील मान्यवर कार्यकर्ते व जनसमुदाय मोठया संख्येने सहभागी झाले होते, त्यांच्या मागे पत्नी, मुलगी, जावई, भाऊ, भावजय, पुतण्या असा परिवार आहे.

दिवंगत अरविंद पवार यांचा पुण्यानुमोदन विधी व शोकसभा रविवार दि. १३ नोव्हेंबर २०२२ रोजी सकाळी ठीक १० वाजता, बीडीडी चाळ १५-ए, नायगाव येथे शाखा क्र. १०७ चे अध्यक्ष सुरेश कांबळे यांच्या अध्यक्षतेखाली करण्याचे योजिले आहे. तरी सर्वांनी मोठया संख्येने उपस्थित राहून आपल्या आदर्शास श्रद्धांजली अर्पण करावी अशी विनंती बौद्धजन सहकारी संघ शाखा क्र. ८ गाव अजगोली या शाखेच्या वतीने काढलेल्या परिपत्रकात केली आहे.




# गुहागर नगरपंचायत कार्यक्षेत्रातील ओबीसी बांधव न्याय हक्कासाठी एकत्र
## लवकरच शहराची ओबीसी कार्यकारिणी निर्माण होणार

**वरवेली वार्ताहर :** ओबीसी संघर्ष समन्वय समिती गुहागर यांच्या वतीने गुहागर नगरपंचायत कार्यक्षेत्रातील सर्व ओबीसी बांधवाना एकत्र करण्यात येत असून समितीचे अध्यक्ष पांडुरंग पाते यांच्या प्रमुख उपस्थितीत गुहागर शासकीय विश्राम गृह येथे बैठक आयोजित करण्यात आली होती.या बैठकीमध्ये ओबीसी चळवळ व आरक्षण या विषयी उपस्थित कार्यकर्त्यांना प्रबोधन करण्यात आले.तसेच लवकरच गुहागर शहराची ओबीसी कार्यकारिणी निर्माण होण्याबाबत चर्चा करण्यात आली.

शिक्षण, नोकरी तसेच राजकीय क्षेत्रात ओबीसी बांधवांना आरक्षण मुद्यावर योग्य तो न्याय मिळावा यासाठी ओबीसी बांधवांचा लढा सुरू आहे आहे,गुहागर तालुक्यात ओबीसी बांधव अत्यंत एकजुटीने या लढ्यात सक्रिय झाले आहेत लवकरच गुहागर नगरपंचायत कार्यक्षेत्रात देखील हा लढा देण्यासाठी ओबीसी बांधव एकत्रित आले आहेत.या बैठकीला अध्यक्ष पांडुरंग पाते, सरचिटणीस निलेश सुर्वे, गुहागर नगरपंचायतीचे नगराध्यक्ष राजेश बेंडल, पद्माकर आरेकर, अजित बेलवलकर, साहिल आरेकर, अमोल गोयथळे,रोहन भोसले, दीपक शिलधनकर, विकास मालप, स्नेहा भागडे, रामाणे गुरुजी, दीपक कनगुटकर, प्रदीप बेंडळ, नरेश पवार, स्नेहा वरंडे, राकेश राऊत , मंदार कचरेकर आदी ओबीसी समाज बांधव उपस्थित होते

# घाणेखुंट मधील राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षामधील पदाधिकारी यांचा
## बाळासाहेबांची शिवसेने मध्ये जाहीर प्रवेश



**दै. गुहागर सत्ता :** महाराष्ट्राचे लोकप्रिय मुख्यमंत्री सन्माननिय एकनाथजी शिंदे साहेब यांच्या कार्यप्रणाली वरती विश्वास ठेऊन रत्नागिरी जिल्ह्यातील खेड तालुक्यातील घाणेखुंट मधील राष्ट्रवादी कॉंगेस पक्षातील पदाधिकारी यांनी बाळासाहेबांची शिवसेना नेते माजी मंत्री सन्माननिय रामदासभाई कदम आणि दापोली विधानसभा आमदार सन्माननिय योगेशदादा कदम यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेऊन सागर महाडिक युवक सरचिटणीस खेड, सुधीर महाडिक, मनिष कांबळे, सचिन गवळी, किशोर रिकामे, दर्शन यादव, संतोष महाडिक इत्यादी पदाधिकारी यांनी बाळासाहेबांची शिवसेनेमध्ये जाहीर प्रवेश केला. त्यावेली रत्नागिरी जिल्हा संपर्क प्रमुख सहदेव बेटकरजी, जिल्हा प्रमुख शशिकांत चव्हाणजी, माज़ी सभापति अन्ना कदम, तालुक़ा प्रमुख अरविंद चव्हाण, युवासेना खेड़ तालुक़ा प्रमुख सुरज रेवने, तालुक़ा सचिव सचिन धाडवे, तालुक़ा संघटक मनोज आंब्रे, युवासेना उपजिल्हाप्रमुख सचिन काते यांच्या उपस्थितित प्रवेश झाला.

# अंजनवेल आरजीपीपीएल येथील बाल भारती पब्लिक स्कूलमध्ये 'ज्ञानमेळा' संपन्न




**वरवेली वार्ताहर :** गुहागर तालुक्यातील अंजनवेल आरजीपीपीएल येथील बाल भारती पब्लिक स्कूलच्या वतीने प्रशालेचे मुख्याध्यापक सुरजीत चटर्जी यांच्या अध्यक्षतेखाली 'ज्ञानमेळा' संपन्न झाला. या कार्यक्रमासाठी प्रमुख अतिथी असीमकुमार सामंता, मुख्य कार्यकारी अधिकारी, आरजीपीपीएल रत्नागिरी, श्रीम. प्रतिभा वराळे, तहसिलदार, गुहागर, श्री. संजयकुमार अग्रवाल, जनरल मॅनेजर, आरजीपीपीएल, श्री.डॉ.जॉन फिलीप, एजीएम एचआर, आरजीपीपीएल, आणि श्रीम. लताजी जॉन त्याचबरोबर आदरणीय पालक यांची उपस्थिती लाभली. प्रमुख उपस्थितांच्या हस्ते दिप प्रज्वलन करण्यात आले. ज्ञानमेळ्याच्या सुरुवातीला गणेश वंदनेच्या उत्तम नृत्य आविष्काराने नववीच्या विद्यार्थींनीनी सर्वांचे स्वागत केले.

त्यानंतर बाल भारती पब्लिक स्कूलचे मुख्याध्यापक सुरजीत चटर्जी यांनी उपस्थित मान्यवरांचे फुलांचे रोपटे देऊन साभार स्वागत केले.आपल्या भाषणातून त्यांनी प्रमुख अतिथींचे आभार मानले. यासमयी श्री. असीमकुमार सामंता, सी.ई.ओ. आरजीपीपीएल रत्नागिरी, त्यांनी आपल्या भाषणातून विद्यार्थ्यांना संबोधित करताना म्हणाले कि, शाळेने या कार्यक्रमाला शास्त्रमेळा हे नाव देता ज्ञानमेळा हे नाव देऊन पाहुण्यांना, पालकांना आणि विद्यार्थ्यांना ज्ञानाचे ग्रहण करण्याची, ज्ञान मिळवण्याची संधी दिली. श्रीम.प्रतिभा वराळे, तहसिलदार म्हणाल्या कि, ज्ञानमेळ्यामुळे आणि गटकार्यामुळे प्रत्येक विद्यार्थ्यांना आपल्या कौशल्यानुरूप काम करता आले. एक नवा अनुभव घेता आला. तसेच शाळा विविध उपक्रम राबवत आहे. यातून विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास गतीने होतो. प्रत्येक मुलाने आपले ध्येय निश्चित करून सचोटी, कठोर परिश्रम आणि शिस्तीवर लक्ष केंद्रित केले पाहिजे असे त्यांनी सांगितले. सृष्टीला प्रकाशित करणाऱ्या ज्ञानदिपाचे उदघाटन श्री. असीमकुमार सामंता सर, सी.ई.ओ. आरजीपीपीएल रत्नागिरी यांनी केले.

प्री स्कूल- ऋतू ,प्री प्रायमरी- सण व पहिलीच्या विद्यार्थ्यांनी प्राणीजीवन चितारले होते. दुसरी ते सहावीच्या विद्यार्थ्यांनी समुदायिक मदतनीस,गणित क्रिया, तर सातवी ते दहावीच्या विद्यार्थ्यांनी जीवशास्त्र, भौतिकशास्त्र व सामाजिकशास्त्र या विषयांवर आपापली मॉडेल्स तयार केली होती. विद्यार्थ्यांच्या एका गटाने बुद्धीला चालना देणा-या खेळातून मनोरंजन केले. ज्ञानमेळयातून विद्यार्थ्यांना गटकार्यामध्ये स्वतःची कौशल्ये वापरण्यासाठी संधी मिळाली. एकमेकांमध्ये विचारांची देवाण घेवाण करता आली. कार्यक्रमाअंती विद्यार्थ्यांच्या ज्ञानातही भर पडली. प्रशालेचे मुख्याध्यापक श्री. सुरजीत चटर्जी यांनी सर्वांचे आभार मानले. हा ज्ञानमेळा यशस्वी होण्यासाठी प्रशालेचे मुख्याध्यापक, शास्त्र,गणित, कला व समाजशास्त्र शिक्षक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, पालक यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

# यशवंतराव चव्हाण सेंटरच्या वतीने
## राज्यस्तरीय युवा पुरस्कारांसाठी आवाहन !

**मुंबई (गुरुदत्त वाकदेकर) :** यशवंतराव चव्हाण सेंटरच्या वतीने युवांसाठी सातत्याने सर्जनशील व प्रोत्साहनपर उपक्रम राबविले जातात. याचाच एक भाग म्हणून सामाजिक, क्रीडा, उद्योजकता, साहित्य रंगमंचीय कलाविष्कार, पत्रकारिता आणि इनोव्हेटर या क्षेत्रांतील विविध गुणवंत युवांना सन्मानित करण्यात येणार आहे.

रुपये २१,०००/- चा धनादेश, स्मृतीचिन्ह व सन्मानपत्र असे या पुरस्काराचे स्वरुप आहे. त्या त्या क्षेत्रामधील अभ्यासू मान्यवर व्यक्तींचा सहभाग असलेल्या निवड समितीमार्फत अंतिम पुरस्कारार्थींची निवड करण्यात येणार आहे. पुरस्कारासाठी व्यक्तीचे वय ३१ डिसेंबर २०२१ अखेरीस ३५ वर्षांच्या आत असले पाहिजे. पुरस्कारासंबंधीची संपूर्ण माहिती व ऑनलाइन फॉर्म www.chavancentre.org या वेबसाईटवर उपलब्ध आहे. अर्ज ऑनलाइन भरण्याची अंतिम तारीख सोमवार, दि.१८ नोव्हेंबर २०२२ असून या पुरस्कारासंबधी अधिक माहितीकरीता




संतोष मेकाले - 9860740569/मनिषा खिल्लारे - 9022716913 या क्रमांकावर संपर्क साधावा. असे आवाहन यशवंतराव चव्हाण सेंटरच्या कार्याध्यक्ष खा. सुप्रिया सुळे यांनी केले आहे.





# सुरळ येथील भाजप ओबीसी सेल गुहागर तालुका अध्यक्ष दिनेश बागकर यांचा वाढदिवस साजरा

**वरवेली वार्ताहर :** गुहागर तालुक्यातील सुरळ येथील येथील भाजप ओबीसी सेलचे अध्यक्ष दिनेश वसंत बागकर यांचा ४८ वा वाढदिवस त्यांच्या निवासस्थानी साजरा करण्यात आला.

यावेळी भाजप गुहागर तालुका अध्यक्ष निलेश सुर्वे, सरचिटणीस सचिन ओक, माजी पंचायत समिती सदस्य दिलीश बागकर, बाळू बागकर, सुनील भेकरे, सतीश ठाकूर, सुरेश शिर्के, संतोष चव्हाण, भाग्यवान बागकर, सोनल बागकर, साईल बागकर, विनोद चव्हाण, पत्रकार गणेश किर्वे आदी मान्यवर उपस्थित होते.



## दुर्गंधी ..

कचरा झाला माणूस
असह्य अशी दुर्गंधी
वाचाळांचे तोंड खुले
उदबत्ती घाल सुगंधी

कुणी बोलावे काही
कुठलीचं नाही बंदी
शब्दआपलेचं व्याही
पाडत रहायची बुंदी

एकमेकां ठेचण्याची
कुणीचं सोडेना संधी
झाड झाले उजाड ते
तोडून मोडून फांदी

शिव तो भोळाभाळा
गडबड करतोयं नंदी
भल्याराजकारणाला
आदत लागली गंदी

कुठे चालले हे रस्ते
कुठल्या युगाचीनांदी
स्वातंत्र्य ना स्वैराचार
झालो सारे स्वच्छंदी

जनता पाहते भकास
चाललेली सुंदोपसुंदी
घरात इतकी भांडणे
कशी राहणार आनंदी

**हेमंत मुसरीफ**
पुणे, 9730306996.
www.kavyakusum.com

## मागे वळून पाहता...

मागे वळून पाहता
मज दिसे बालपण ।
अजाणता होते छान
नको मज थोरपण ॥

होते सदन कौलारू
पण त्यात प्रेम फार ।
आई रखुमाई माझी
बाप विठू अवतार ॥

दोन घास आवडीने
आई हाताने भरवी ।
दूर मळभ करण्या
येई प्रभातीला रवी ॥

विटी दांडू, लपाछपी
खेळायचो भरपूर ।
शाळेमध्ये जाण्यासाठी
आम्ही व्हायचो आतुर ॥

जसजसे मोठे झालो
बालपण हरवून ।
आज उदर भरण्या
बाद झालो घरातून ॥

**अजय रमेश चव्हाण,**
तरनोळी, ता. दारव्हा, जि. यवतमाळ
मो.८८०५८३६२०७

# कष्टकरी – शेतकरी लाकूड व्यापारी संघटनेच्या अध्यक्षपदी योगेश खांडेकर



**गुहागर प्रतिनिधी :** चिपळूण तालुक्यातील रामपूर बीट कष्टकरी शेतकरी लाकुड व्यापारी संघटनेची कार्यकारणी जाहीर झाली असून अध्यक्षपदी शिवसेनेचे युवा पदाधिकारी योगेश खांडेकर यांची निवड करण्यात आली.

या संघटनेत उपाध्यक्षपदी प्रथमेश भोबस्कर, सचिव तानाजी वणे, उपसचिव संतोष बंगाल, खजिनदार विलास निकम, सल्लागार नागेश जाधव, अशोक पोवळे, नंदकुमार सावंत, सदस्यपदी ऋषी थरवळ, सोहम खातू, अरविंद सुर्वे यांची निवड करण्यात आली. यावेळी संघटनेच्यावतीने रामपूर विभागात विविध उपक्रम राबविण्याचे व सामाजिक कार्यात अग्रेसर राहण्याचे ठरविण्यात आले. यावेळी सिताराम तांबे, राजू खातू, अरुण जाधव, चंद्रकांत झाधव, राजेश जाधव, धनंजय साळुंखे, रुपेश खांडेकर, विनोद भोबस्कर, प्रभाकर कोंडविलकर, मारुती ब्रीद, विजय भुवड, कापले सर, मंदार साळुंखे, रमेश मोरे, शिवराम आग्रे, केशव पालशेतकर, अतुल मयेकर, जनार्दन इंदुलकर, हरिश्चंद्र कापले आदी उपस्थित होते. या सर्वांनी नवीन कार्यकारणीचे अभिनंदन केले.

# गुढे गावच्या रस्ता विकासाची गुढी अधांतरीतच

## रस्ता दुरूस्तीसाठी 20 वर्षे प्रतिक्षाच, वाहनचालक, प्रवाशांचा जीव मुठीत घेऊन प्रवास



**मार्गताम्हाने/वार्ताहर :** चिपळूण तालुक्यातील रामपूर गुढेफाटा ते गुढे कोंडवी रस्ता गेली २० वर्षे दुरुस्तीच्या प्रतिक्षेत आहे. शिरवलीपासून गुढे मोरेवाडीपर्यंत सुमारे ९ कि.मी. च्या या रस्त्याची चाळण झालेली असून रस्त्यावरील मोठ- मोठ्या खड्ड्यांमुळे हा मार्ग वाहतुकीसाठी धोकादायक बनला आहे. त्यामुळे वाहनचालक व प्रवाशांना या मार्गावरून जीव मुठीत घेऊन प्रवास करावा लागत आहे.

रामपूर ते गुढे रस्ता हा उमरोली, पाथर्डी, शिरवली, मिरवणे, ताम्हणमळा, गुढे, डुगवे या गावांतील नागरिकांसाठी दळणवळणाचा मुख्य मार्ग आहे. या रस्त्यावर मोठ-मोठे खड्डे पडले आहेत. वाहने आपटण्याचे प्रकारही सुरु असून वाहनचालक व प्रवाशांना हा मार्ग धोक्याचा बनला आहे. या रस्त्याच्या दुरुस्तीसाठी वारंवार विनंती, अर्ज विनविण्या करण्यात आल्या मात्र, संबंधित विभागाने दुर्लक्ष केले आहे. हा रस्ता जिल्हापरिषदेच्या अखत्यारीत असून तो सार्वजनिक बांधकाम विभागाकडे वर्ग करण्याची प्रक्रिया सुरु आहे. मात्र, अद्यापही या रस्त्याच्या निधीसाठी प्रतिक्षा करावी लागत आहे. या रस्त्याला जवळपास १५ गावे जोडली गेली आहेत. मात्र, रस्त्याची बिकट अवस्था झाल्याने वयोवृध्द, आजारी व्यक्ती आणि स्थानिकांचे खूपच हाल होत आहेत. २० वर्षे हा रस्ता दुरुस्तीच्या प्रतिक्षेत आहे. या रस्त्याबाबत वैयक्तिकरित्या व गाव, वाडी, मंडळ, संस्था अशा प्रत्येकाने निवेदने दिली आहेत मात्र, अद्याप कोणतीच कार्यवाही झालेली नसल्याची माहिती येथील ग्रामस्थ सुदेश नावले यांनी दिली.

# विक्री केलेल्या बँचेसची रक्कम त्वरित भरणा करावी !

## कोंड शृंगारी उर्दू शाळा प्रकरणी, जिल्हा शिक्षण अधिकाऱ्यांना पत्र

## परप्रांतीय भंगारवाल्यावर कारवाई व्हावी

**गुहागर प्रतिनिधी :** जिल्हा प्राथमिक शिक्षण अधिकाऱ्यांकडे प्राप्त झालेल्या चौकशी अहवालानुसार गुहागर तालुक्यातील कोंड शृंगारी जि.प.उर्दू शाळेतील विक्री केलेल्या बँचेसची रक्कम त्वरित भरण्याचे आदेश देण्यात यावेत, असे पत्र गुहागर पंचायत समिती शिक्षण विभागाने जिल्हा शिक्षण अधिकारी रत्नागिरी यांना पाठविले आहे. शृंगारतळी येथील कोंड शृंगारी शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष अली महम्मद युसुफ वणू यांच्या चौकशी अहवालानुसार विक्री केलेल्या बँचेसची रक्कम रु.८५०० /- कोंड शृंगारी जि.प. उर्दू शाळा मुख्याध्यापक यांच्या खात्यावर त्वरित भरण्यात यावी व याकामी विलंब होणार नाही याची दक्षता घेण्यात यावी, असे कळविले होते. मात्र शृंगारतळी येथील अल्ताफ हुसेन ठाकूर यांनी ५ जुलै २०२२ रोजी शाळा व्यवस्थापन समिती सभेत हा विषय काढला असता, रक्कम जमा न केल्याचे समजले. याबाबत वरिष्ठ स्तरावरून लवकरात लवकर योग्य ती चौकशी व्हावी, असे या कार्यालयाकडे कळविण्यात आले आहे. शृंगारतळी बाजारपेठ परिसरामध्ये अनेक भंगारवाले आहेत. यातील पालपेणे रोडवर आपले बस्तान बांधलेल्या परप्रांतीय भंगारवाल्याने कोणतीही चौकशी न करता या शाळेचे बँचेस भंगारमध्ये घेऊन त्याची तोडमोड केली व या भंगारवाल्याने संबंधित व्यक्तीला रक्कम अदा केली. अशा वस्तू भंगारमध्ये घेणाऱ्या परप्रांतीय भंगारवाल्यावर शासनाची कारवाई का होत नाही ? असे जनतेतून बोलले जात आहे.

# 'पु. ल. अकादमी'तील अधिकाऱ्याच्या गलथान कारभारामुळे नाराजी



**मुंबई :** महाराष्ट्राचे लाडके व्यक्तिमत्त्व पु. ल. देशपांडे यांच्या जन्मदिनापासून साजऱ्या होणाऱ्या पुलोत्सव परंपरेला यंदा अकादमीच्या गलथान कारभारामुळे खंड पडला. त्याचा मोठा फटका राज्यातील शेकडो कलावंतांना बसला आहे. पुलोत्सवासाठी स्वतःच्या प्रयोगाच्या तारखा राखून ठेवणाऱ्या तसेच त्याची तालीम करीत असलेल्या लोककलावंतांमध्ये या महोत्सवाच्या तारखा अचानक पुढे ढकलल्यामुळे मोठी नाराजी पसरली आहे. एका अधिकाऱ्याच्या मनमानी कारभारामुळेच असा गोंधळ झाल्याची चर्चा अकादमीत आहे. पु. ल. देशपांडे यांच्या जन्मदिनापासून साजरा होणारा पुलोत्सव म्हणजे चित्रपट, नाटक, संगीत, साहित्य आणि लोककलावंतांचा जलसा असे समीकरण आहे. पुलंच्या नावाने सन्मान आणि सादरीकरणाची संधी, नवनवीन कल्पनांचे व्यासपीठ आणि नव्या कलाकारांना ओळख देणारा म्हणून या महोत्सवाचा लौकिक आहे. यंदा सरकारकडून सण सोहळे मोठ्या उत्साहात साजरे होत आहेत. पुलोत्सव मोठ्या दणक्यात साजरा होईल अशी चर्चा होती. मात्र, यंदा कोणतीही पूर्वकल्पना न देता या उत्सवाच्या तारखा पुढे ढकलण्यात आल्या आहेत. अकादमीत फोन केल्यास कोणीही उपलब्ध नव्हते. त्यामुळे कलावंत अजून संतापले होते. कलावंतांचे नियोजन गडबडलेले दिसले. याला नेमके कोण जबाबदार आहे, याचा विचार शासनाने करावा असे म्हणणे लोककलेचे ज्येष्ठ अभ्यासक डॉ. गणेश चंदनशिवे यांचे आहे.

# मिठगवाणे येथील तेली समाज बांधवाची शोभायात्रा संपन्न

**५०० हून अधिक मशालीच्या प्रकाश झोतातील शोभायात्रा ठरली लक्षवेधी**

**तेली समाजातील महाराष्ट्रातील प्रमुख पदाधिकाऱ्यांचा समावेश**



**वरवेली गणेश किर्वे :** राजापूर तालुक्यातील मीठगवाणे येथील श्री देव अंजनेश्वराच्या कार्तिक उस्तवात मिठगवाणे येथील तेली समाजाची मशालीच्या प्रकाश झोतातील शोभायात्रा संपन्न झाली.

राजापूर तालुक्यातील मीठगवाणे गावात दरवर्षी पाच ते सहा दिवस श्री देव अंजनेश्वराचा कार्तिकोस्तव साजरा केला जातो. मीठ गव्हाणे गावात तेली समाज भरपूर आहे. फार पूर्वी हा उत्सव तेल्यांच्या मशालीच्या प्रकाश झोतात साजरा केला जायचा. त्याप्रमाणेच यावर्षीच्या कार्तिकोस्तवात तेली समाजाच्या मशालीसह शोभा यात्रेसाठी मंदिर प्रशासनाच्या विश्वस्तानी एक दिवस राखीव ठेवला. रविवारी संध्याकाळी मीठगवाणे शिवाजी चौक येथून या शोभा यात्रेला सुरुवात झाली. अंजनेश्वर मंदिरा पर्यंत एक किलोमीटरचा रस्ता फक्त तेली समाजातील बंधू भगिनी यांच्या हातातील जवळजवळ ५००हून अधिक तेलाच्या मशाली, पुरुषांचा सफेद पोषाख व स्त्रिया नऊवारी, डोक्यावर "जय संताजी" नावाच्या टोप्या अशा पोशाखात भरून गेला होता. संताजी महाराजांची पालखी, ढोल ताशा पथक, पाठोपाठ मानवी देखावा, वारीचा देखावाही त्यात सामील होते. जवळजवळ एक तास शिस्तबद्ध व उत्साहाच्या वातावरणात ही शोभायात्रा सुरू होती.या वेळी तेली समाजातील महिलांनी विठ्ठल गीतावर सुंदर टाळ नृत्य सादर केले. शोभायात्रा मंदिरात पोहोचल्यानंतर श्री देव अंजनेश्वराची पालखी सोबत श्री संताजी जगनाडे महाराजांची पालखी , तेली समाजाच्या ५००हूनअधिक मशालीच्या प्रकाश झोतात मंदिर प्रदक्षिणा करण्यात आली. यावेळी तेली समाजातील बांधवांनी भक्ती गीते सादर केली. मीठ गव्हाणे पंचक्रोशीतील ग्रामस्थांनी आणि आलेल्या पाहुण्यांनी, न भूतो न भविष्य अशा या सुंदर शोभा यात्रेचा अनुभव घेतला. जिल्ह्यातील सर्व थरातून तेली समाजाच्या मशाल शोभा यात्रेची चर्चा व कौतुकाचा वर्षाव मीठगवाणे तेली समाजावर होत आहे.ही शोभायात्रा यशस्वी होण्यासाठी तेली समाजाचे प्रमुख श्रीधर पावसकर यांच्या नेतृत्वाखाली संपूर्ण मिठगवाणे तेली समाज गेले तीन महिने भरपूर मेहनत घेत होता.आणि या मेहनतीचे कौतुक करण्यासाठी आणि हा सोहळा" याची देही याची डोळा "पाहण्यासाठी महाराष्ट्र प्रांतिक तैलिक महासभेचे कोषाध्यक्ष गजानन शेलार, महासचिव डॉ.भूषण कर्डिले,कोकण विभाग अध्यक्ष सतीश वैरागी,ठाणे विभाग अध्यक्ष व राज्य समन्वयक सुनील चौधरी, मुंबई महिला विभाग प्रमुख रोहिणीताई महाडिक,जयश्री वैरागी, रत्नागिरी जिल्हा तेली समाज अध्यक्ष रघुवीर शेलार,राजापूर तालुका अध्यक्ष नरेश शेलार,मुंबई माजी नगरसेवक मारुती खेडसकर,आणि सिंधुदुर्ग, रत्नागिरी, रायगड, मुंबईचे अनेक संस्थांचे आजी माजी पदाधिकारी हजर होते. त्यांच्यामुळे मशाल यात्रेला आणखीन शोभा आली.ही मशाल यात्रा यशस्वी होण्यासाठी मीठगव्हाणे समाजातील वरिष्ठ मंडळींच्या नेतृत्वाखाली तरुण मंडळींनी अथक प्रयत्न केले त्यामुळेच हा सोहळा भव्य दिव्य असा साजरा झाला.

## श्री साईनाथ सेवा मंडळ रामपूर, तांबी, रावळगाव, आणि लाईफ केअर हॉस्पिटल चिपळूण त्यांच्या संयुक्त विद्यमाने मोफत आरोग्य तपासणी व सर्व रोग निदान मोफत शिबिर

**वरवेली वार्ताहर :** चिपळूण तालुक्यातील श्री साईनाथ सेवा मंडळ रामपूर, तांबी, रावळगाव, आणि लाईफ केअर हॉस्पिटल चिपळूण त्यांच्या संयुक्त विद्यमाने मोफत आरोग्य तपासणी व सर्व रोग निदान मोफत शिबिर गुरुवार दिनांक 10/11/2022 रोजी सकाळी 10 वा.ते 3वा. तांबी स्टॉप येथे श्री साईनाथ सेवा मंडळ रामपूर तांबी रावळगाव श्री साई भंडारा निमित्य मोफत पूर्णपणे आरोग्य तपासणी, तज्ञ डॉक्टरांचे तपासणी व मार्गदर्शन, नेत्र तपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया, स्त्री रोग तज्ञ, छातीची पट्टी तपासणी इ.सि.जी. मधुमेह तपासणी कॅन्सर तपासणी शिबिरा दरम्यान लागणारी सगळी औषध पूर्णपणे मोफत व पुढील उपचारासाठी ज्या रुग्णांना हॉस्पिटलला जावे लागेल त्या रुग्णांसाठी मोफत व सवलतीच्या दरात उपचार तपासण्या व शस्त्रक्रिया केल्या जातील तरी या सेवेचा लाभ घ्यावा असे आव्हान श्री साईनाथ सेवा मंडळ रामपूर, तांबी, रावळगाव, यांनी केले आहे तरी गरजू रुग्णांनी आणि भक्तजणांनी आपले रुटिंग चेकअप जरूर करून घ्यावे नम्र विनंती.



# मी गुरुजी बोलतोय

## एक विशेष भाग तरूण पिढीसाठी...

***असं का घडू शकतंय.......?***

*सर्दी, पडसं, ताप कमी करण्यासाठी, तोच फर्स्ट एड बॉक्स असायचा.....! छातीतला कफ कमी करण्यासाठी, हळद पटकीचा गरम शेक असायचा......! फुफ्फुसातील कफ घालविण्यासाठी, मिठाचे पाणी पिणे हा रामबाण उपाय असायचा......! सारं कसं छान असायचं......! संपूर्ण घर निरोगी असायचं......! त्यातली औषधं आता मिळणार नाही......!आजवर जे मिळालं ते विसरुन चालणार नाही.....!तब्येत तर संभाळावीच लागणार... पणआता वाट पाहूनही ते सुख काही मिळणार नाही.....! उरलेल्या जिवांनी, आता थांबूनही चालायचं नाही.....! समीकरणं बदलली आहेत......!नव्या पिढीने वैद्यकिय प्रगती केलेयं......!जागतिक आरोग्य संघटना सोबत आहे......!आर्थिक धोरणातही बदल झाल्येत.......!पैसा आणि फक्त पैसा इतकंच नातं तयार झालंय.....!सर्वसामान्य म्हणून आपण गोंधळून गेलोय.....!इथेच......स्वतःला सावरायचंय..... स्थिर ठेवायचंय......!आजवर जे मिळालं ते विसरुन चालणार नाही.....!कारण....... आता वाट पाहूनही ते सुख मिळणार नाही.....! उरलेल्या जिवांनी, आता थांबून चालायचं नाही..... !विशेषतः तरुण पिढीने आता सतर्क राहावे..... सुयोग्य विकासासह सुखाची अपेक्षा करणाऱ्या तरुणांनी, इथे एक विचार करायला हवा की, दोष फक्त राजकारण्यांचा आहे का ? नाही ! खरं तर भारतीय नागरीक आणि हक्काचे मतदार म्हणून दोष आपला सर्वांचाच आहे. आपणच आपल्या डोळ्यांवर झापड बांधून जगतोय. स्वत:च स्वत:ची फसवणूक करून घेतोय. 'भारत हा सर्व अनुयायांचा देश आहे' आणि आजही आपण डोळे बंद करून फक्त अनुयायी होऊन, त्या गर्दीचा भाग होतोय. देशाच्या स्वातंत्र्य चळवळीने आपल्याला छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती शाहू महाराज, क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिबा फुले, बोधीसत्व बाबासाहेब आंबेडकरांसारख्या विविध समाजसुधारकांनी मोलाचे विचार दिले. पण नेहमीप्रमाणे आपल्याला हवेत फक्त पुतळे ! प्रसंगी फुलहार घालून उत्सव करायला अन् प्रसंगी त्यांची विटंबना करुन चपलांचे हार टाकून दंगली करायला. आणि आपल्याला इथे हवेत नेते, चुकांचे खापर एकमेकांच्या डोक्यावर फोडायला. आपण काय करतोय ? फक्त जमाव बनवण्यासाठी त्यांची मदत करतोय, खरे तर प्रत्येक सक्रिय कार्यकर्ता हा उच्च महत्त्वाकांक्षा असलेला राजकीय नेता असतो; असं वाचल होतं. पण आपली उडी असते फक्त इतरांची खुशमस्करी करुन त्यांची हाजी हाजी करणे.*

*मुख्य म्हणजे आपल्यातून असा कुणी पुढे येत नाही. तसे प्रश्नच आपण विचारत नाही. कारण "प्रश्न" करायला आपल्याच संकल्पना अजून स्पष्ट नाहीत. जरा विचार करुया, आपण कुणाकडून कोणत्या बदलाची आशा, अपेक्षा करतोय ?* (क्रमशः)

**शाहीर वसंत भातडे**
**(बुध्द चरित्र कथनकार)**
**मो. ९९६७९८३३०२**